# श्री आशिर्वाद सहकारी गृहरचना संस्था मर्यादित.

पत्ता :- स.नं.९/३/४/अे,कोथरूड, पुणे :-४११ ०२९.

नोंदणी क्र.:- पीएन्ए/पुणे सिटी/एच्एसजी/१७४८/८२ दि.२३/०२/१९८२.

---

## विशेष सर्वसाधारण सभेचा वृत्तांत

श्री आशिर्वाद सहकारी गृहरचना संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा दिनांक ०७.०३.२०२० रोजी सायंकाळी ५.०० वाजता सुरू झाली. परंतु गणसंख्येअभावी हि सभा ५.३० वाजता सुरू करण्यात आली. सभेस २० सभासद उपस्थित होते. श्री. बिपीन इनामदार यांनी उपस्थित सभासदांचे स्वागत केले सभेचे कामकाज विषयानुसार सुरुवात करण्यास प्रकल्प सल्लागार श्री.संजय सुर्यवंशी यांना विनंती केली.

विषय क्रमांक ०१:- संस्थेच्या व सभासदांच्या कायदेशीर कागदपत्रांचा अहवाल सादर करणे.

ठराव क्रमांक ०१:- श्री.संजय सुर्यवंशी यांनी संस्थेत दरम्यानच्या काळात झालेल्या सभासदांच्या कायदेशीर कागदपत्रे तपासणीबाबतचा आढावा घेतला. व कायदेशीर त्रुटींबदद्ल मार्गदर्शन केले.

श्री.पाटील यांनी या तपासणीचा सविस्तर अहवाल सर्व सभासदांना देण्यास सांगितले ही सुचना सचिवांनी मान्य केली.

सुचक:- श्री.एस.व्हि.पोतदार अनुमोदक:-श्री.के.ए.खंडेलवाल

विषय क्रमांक ०२:- संस्थेच्या टेंडर प्रक्रिये संदर्भात सर्व सभासदांसमोर चर्चा करणे.

ठराव क्रमांक ०२:- श्री.संजय सुर्यवंशी यांनी सभासदांच्या म्हणण्यानुसार पुनर्विकसनसाठी टेंडर टेंडर प्रोसेस सुरू करावी असे या सभेत ठरविण्यात आले. सहकार खात्याच्या नियमावली प्रमाणे कोणत्याही एका पेपर मध्ये आपल्या संस्थेची जाहिरात देण्यात यावी. त्यामध्ये टेंडर फॉर्म आणि

आपल्या संस्थेचे काहि अत्यावश्यक कागदपत्रे Xerox विकसकांना द्यावी लागतात जेणेकरून ते त्या कागदपत्रांव्दारे अभ्यास करून त्यांना आपण दिलेला टेंडर फॉर्म भरण्यास मदत होईल. असे ठरविण्यात आले. सदर टेंडर फॉर्मची किंमत रू.५०००/- इतकी ठेवावी. त्याचप्रमाणे श्रीमती. स्वाती पाडळकर यांनी टेंडर फॉर्म जो आहे तो सर्व सभासदास देण्यात यावा अशी विनंती केली ती सचिवांनी मान्य केली. तसेच टेंडर स्वीकारण्याच्या व नाकारण्याच्या अधिकारांबाबत योग्य तो मजकुर जाहिरातीत असावा. तसेच जे विकसक टेंडर घेऊन जाणार आहेत त्यांचा योग्य तो हिशोब संस्थेसमोर सादर केला जाईल असे ठरविण्यात आले व टेंडर प्रक्रिये संदर्भात लागणारे ते योग्य मार्गदर्शन श्री. संजय सुर्यवंशी यांनी उपस्थित सभासदांसमोर केले. या सर्व प्रोसेसबदद्ल उपस्थित सभासदांनी सर्वानुमते टेंडर प्रोसेसे चालु करण्याची संमती दिली. सभेपुढे अन्य विषय चर्चेस नसल्यामुळे मा.सचिवांनी संध्याकाळी ७.३० वाजता सभा संपल्याचे घोषित केले.

सुचक:- श्री.रविंद्र बिवलकर अनुमोदक:-श्रीमती.स्वाती पाडळकर